ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख १३ जानेवारी, १९५४ अंक १

## विविध माहिती

**भारताला हंगेरीची मदत**—भारतामधील पूरपीडित लोकांना मदत म्हणून हंगेरीच्या रेड-क्रॉस सोसायटीनें भारतीय रेड-क्रॉस सोसायटीला १० हजार रुपयांची देणगी दिली आहे. भारतीय रेड-क्रॉस सोसायटीचे चिटणीस श्री. बलवंतसिंग पुरी ह्यांना ही रक्कम हंगेरीच्या दिल्ली येथील वकिलातीतर्फे नुकतीच मिळाली.

**बडोदा बँकेची शाखा**—युगांडाची व्यापारी राजधानी कंपाला येथें बँक ऑफ बडोद्यानें आपली शाखा उघडली आहे. मोंबासा येथेंहि बँकेची शाखा उघडण्यांत आली असून पुढील वर्षी नैरोबी येथेंहि शाखा उघडण्याचा विचार चालू आहे. आफ्रिकेंत व्यवहार करणारी ही तिसरी भारतीय बँक आहे.

**जागतिक बँकेचें सीलोनला कर्ज**—सीलोनमधील जलविद्युत् केंद्राचा विकास करण्यासाठी कर्ज देण्याची एक योजना जागतिक बँकेनें तयार केली असून तीबद्दल सीलोनच्या सरकारशीं वाटाघाटी करण्यांत येणार आहेत. बँकेच्या मतानें ही योजना तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या निर्दोष आहे.

**डेअरीवाल्यांसाठी नवी व्यवस्था**—दिल्ली राज्य सरकारनें डेअरीच्या धंद्याचा विकास करण्याची योजना तयार केली आहे. योजनेप्रमाणें शहराच्या दाट लोकवस्तींत असलेल्या ४०० अनधिकृत डेअऱ्या यमुनेच्या पलीकडे हलविण्यांत येणार आहेत. दिल्लींत सुमारें २,००० अनधिकृत गोठीवाडे असून त्यांच्यामुळें शहरांत आरोग्यास घातक अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

**प्राचीन कालांतील विटांचा उपयोग**—नेपाळची राजधानी काटमांडू येथून ७० मैल दक्षिणेला सिमरोनगड नांवाचें प्राचीन गांव आहे. तीन शतकांपूर्वी येथील राजे नेपाळवर राज्य करीत होते. ह्या नगरांतील विटांचा घर बांधण्यासाठी अगर इतर कामासाठी उपयोग करण्यांत येऊं नये, अशी आज्ञा काढण्यांत आली आहे.

**कलकत्ता येथें नवें हिंदी दैनिक**—कलकत्ता येथील 'अमृत बझार' पत्रिकेचे संपादक श्री. तुषार कांति घोष ह्यांनीं 'विकास' ह्या नांवाचें एक नवें हिंदी दैनिक सुरू केलें आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना भारतामधील दैनिकांच्या अडचणींसंबंधीं त्यांनीं विवेचन केलें.

**आसाममध्यें सिमेंटचा कारखाना**—आसाममधील बोकाजन ह्या गांवीं सिमेंटचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं १ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. असोसिएटेड कंपनीच्या राज्य सरकारशीं ह्याबाबत चाललेल्या वाटाघाटी संपून करारहि करण्यांत आला आहे. कारखान्याच्या बांधकामाला पुढील वर्षाच्या प्रारंभीं सुरवात होईल, असें समजतें.

**बिहारमधील रस्त्यांचा विस्तार**—बिहार राज्यांतील रस्त्यांचा विकास घडवून आणण्यासाठीं आणि नवे रस्ते बांधण्यासाठीं भारतीय सरकारनें २,७५,००००० रुपयांचें कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. ह्याच कामासाठीं राज्य सरकारला आणखी एक कोटी रुपयांचें कर्ज मिळण्याची अपेक्षा आहे.

**बुद्धाचें जन्मस्थान**—भैरव आणि लुंबिनी बाग ह्यांच्या दरम्यान रस्ता तयार करण्यासाठीं नेपाळ सरकारनें १० हजार रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. लुंबिनी बाग ह्या ठिकाणीं गातमबुद्धाचा जन्म झाला होता. त्याचप्रमाणें जवळच असणारे पोरवारा नांवाचें ठिकाण आरोग्याचें ठिकाण म्हणून तयार करण्याची एक योजना आखली गेली आहे.

**हिंदी रेल्वेजची कामगिरी**—भारतीय रेल्वेजनीं आतांपर्यंत तिसऱ्या वर्गाच्या १० हजार डब्यांतून पंखे बसविले आहेत आणि १०,२०० डब्यांमधून अधिक चांगला प्रकाश देणारी व्यवस्था केली आहे.

**शेतीसाठीं सहकारी बँक**—काश्मीर राज्यांतील शेतकऱ्यांना पतीवर स्वस्त दरानें कर्जें मिळवून देण्यासाठीं काश्मीरचें सरकार एक सहकारी बँक काढणार आहे. बँकेचें भांडवल प्रारंभीं १० लाख रुपयांचें राहील आणि त्यांतील ७ लाख रुपयांचे भाग काश्मीरचें सरकार विकत घेणार आहे. ह्या बँकेचा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआशीं संबंध राहील, असें कळतें.

**हिंदू देवळाचा जीर्णोद्धार**—इंडोनेशिआंत जोगजाकार्तापासून कांहीं अंतरावर ९ व्या शतकांत बांधलेलें एक हिंदु देवालय आहे. ह्या देवालयाचा जीर्णोद्धार नुकताच करण्यांत आला. ह्या प्रसंगीं इंडोनेशिआचे अध्यक्ष हजर होते. जीर्णोद्धाराचें काम ३५ वर्षें चाललें होतें. आतां तें देऊळ ९ व्या शतकांत बांधलेल्या मूळच्या देवळाप्रमाणें हुबेहुब दिसत आहे.

**चहाचें तयार चूर्ण**—ब्रिटनचें युद्धखातें चहा, साखर आणि दूध ह्यांच्या मिश्रणाची ऊन पाण्यांत विरघळणारी एक पूड तयार करण्याचा प्रयोग करीत आहे. हें मिश्रण सध्या ब्रिटनच्या मलायामधील सैनिकांना उपयोग करण्यासाठीं दिलें आहे.

**लाकडी टंकलेखक**—प. जर्मनीमधील ड्रेसडेन ह्या गांवीं टंकलेखन यंत्रांचें एक प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांत १८६४ सालीं तयार केलेला एक लाकडी टंकलेखक ठेवण्यांत आला होता. ह्या टंकलेखकांत घालण्यांत आलेल्या कागदावर अक्षरें छापलीं न जातां तीं कापलीं जातात. ह्याच प्रदर्शनांत २,५०० खिळे असणारा एक आधुनिक चिनी टंकलेखकहि ठेवण्यांत आला होता.

## कण आणि क्षण

मोठमोठ्या विषयांवरील विवेचनात्मक ग्रंथ पुष्कळच निर्माण होत असतात व प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनाशीं ज्याचा तिळ-प्रायहि संबंध नाहीं असेंहि पुष्कळच ललितवाङ्मय निर्माण होत असतें. पण मनुष्याचें रोजचें व्यावहारिक जीवन हाच विवेचनाचा विषय घेऊन त्यावर मराठींत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींहि पुस्तकें निर्माण झालेलीं नाहींत. वास्तविक आजच्या पिढीला अशा तऱ्हेच्या व्यावहारिक मार्गदर्शनाची व तीहि पंतोजींच्या भूमिकेवरून उगाच कोरडे ओढीत केलेल्या मार्गदर्शनाची नव्हे तर सौहार्दमय मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे. व्यक्ति-जीवन हें वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक असें तीन प्रकारचें असतें. या त्रिविध स्वरूपाच्या जीवनाची जुनी घाटणी बदलून जाऊन त्याऐवजीं नवे अर्थव्यवहार व नव्या सामाजिक कल्पना यांना अनुसरून नवी घाटणी उत्पन्न झालेली आहे. त्यामुळें पति व पत्नी, आई, बाप व मुलगा, सून व सासू यांचे जे जुने प्रश्न होते, त्यांची जागा आतां अगदीं नव्या प्रश्नांनीं घेतलेली आहे. सामाजिक जीवनहि अशाच प्रकारें नव्या स्वरूपांत प्रगट झालेलें आहे. उत्पन्न झालेलें नवें जीवन अजून रुळलेलें नसल्यामुळें त्यांत 'सुख पाहतां जवा पाडे। दुःख पर्वताएवढें' अशी अवस्था प्रत्ययास येते. तरीहि जुन्या गोष्टींचें कोणाला केवढेंहि आकर्षण वाटलें तरी त्याकडे वळतां येणें शक्य नाहीं व नव्याच्या घडणीं-तून मुक्त होणेंहि शक्य नाहीं, अशा स्थितींत आज हें त्रिविध व्यावहारिक जीवन अधिकांत् अधिक आनंदी व यशस्वी कसें करतां येईल याचें मार्गदर्शन अत्यंत स्वागतार्ह आहे. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक श्री. श्रीपाद वामन काळे (संपादक 'अर्थ') यांनीं काळाची गरज ओळखून अत्यंत मोलाची कामगिरी केलेली आहे. जीवनांतील अत्यंत लहानसहान बाबी विचारांत घेऊन त्यांनीं जिव्हाळ्याच्या मित्राच्या भूमिकेवरून आनंदी व यशस्वी व्याव-हारिक जीवन घडविण्याच्या दृष्टीनें अत्यंत अचूक मार्गदर्शन केलेलें आहे. पुस्तकाची भाषा ओघवती व शैली इतकी वेधक आहे कीं, शेवटपर्यंत वाचल्याविना पुस्तक खालीं ठेववत नाहीं. संसार यशस्वी करूं इच्छिणाऱ्या प्रत्येकानें हें पुस्तक अवश्य वाचावें.

प्रकाशक—श्री. वा. काळे संपादक 'अर्थ' दुर्गाधिवास, पुणें ४, (मूल्य २॥ रुपये, पृष्ठसंख्या १६८).

"महाराष्ट्र" नागपूर, २७–१२–५३

---

## कण आणि क्षण

(ले. श्री. वा. काळे, बी. ए., संपादक 'अर्थ' पुणें ४ किं. रु. २॥)

मानवी जीवनांतील कणानुकण आणि क्षणानुक्षण उपयुक्त रीतीनें, समंजसपणें आणि परोपकारी वृत्तीनें सार्थकी कसा लावावा त्याचें व्यावहारिक योग्य मार्गदर्शन ह्या पुस्तकांत करण्यांत आलें आहे. अनुभवी शिक्षकानें, गुरूनें अगर वडील-धाऱ्या माणसानें केलेला व्यवहारोपयोगी हितोपदेश असेंच ह्या पुस्तकाचें वर्णन करावें लागेल. स्त्री–पुरुषांना सारखेंच वाचनीय व अनुकरणीय असें हें पुस्तक प्रसिद्ध करून मराठी साहित्यांत महत्त्वाची भर घातल्याबद्दल लेखक अभिनंदनास पात्र आहेत. विमा प्रचारकानें हें पुस्तक आत्मसात् केल्यास त्याला "सत्या 'अर्था'नें फायदा झाल्यासेरीज राहाणार नाहीं.

— विमा आणि व्यापार, नोव्हेंबर १९५३

## सिनेमागृहांच्या उत्पन्नांत घट

द. भारतामधील सिनेमागृहांच्या व्यवसायाविषयीं साउथ इंडिअन फिल्म चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालाच्या शेवटीं असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे कीं, १९५३ सालांत द. भारतामधील स्टुडिओजनीं चित्रनिर्मिति पूर्वी कधींहि केली नव्हती इतकी केली, पण सिनेमागृहांच्या गल्ल्यांत मात्र खूपच घट झालेली आढळून आली. १९५२ सालीं ७८ चित्रपट काढण्यांत आले होते. त्यांची संख्या १९५३ सालीं ९३ झाली. मद्रास राज्यांत खुद्द मद्रास शहरांतच हा धंदा विशेष प्रमाणांत केंद्रित झाला आहे. ९३ चित्रपटांपैकी ६७ मद्रास शहरांत, ७ त्रावणकोर–कोचीन राज्यांत, कोइमतूर व सालेम येथें ६, म्हैसूरमध्यें ५, आणि बाकीचे चित्रपट इतरत्र काढण्यांत आले. गेल्या वर्षीच्या चित्रपट–उत्पादनाचा विशेष असा कीं, परदेशीं पाठविण्यासाठीं म्हणून चित्रपटांची निर्मिति प्रथमच करण्यांत आली. भारतीय भाषां-मधील दोन यशस्वी चित्रपट इंग्रजी भाषेंतील संवाद जोडून परदेशीय बाजारपेठेसाठीं तयार करण्यांत येत आहेत. सेन्सॉरकडे आलेल्या ९४ चित्रपटांपैकी ४५ तामीळ भाषेंतील, ३१ तेलगू भाषेंतील, ७ कानडी भाषेंतील, ७ मलायम् भाषेंतील, दोन हिंदी भाषेंतील आणि २ इंग्रजी भाषेंतील असे होते. ७५ टक्के चित्रपट दोन भाषांमधून घेण्यांत आले. कच्च्या फिल्मचा पुरवठा, स्टुडिओ मिळण्याची सुलभता आणि तंत्रज्ञांची अनुकूलता ह्या गोष्टींच्या संयोगामुळें १९५३ सालीं चित्रपटांच्या उत्पादनांत वाढ झाली, असें नमूद करण्यांत आलें आहे.

---

## ग्रामोद्योगांना मदत करण्याची योजना

उत्तर प्रदेशांतील बऱ्याच ग्रामोद्योगांना अ. भारतीय ग्रामो-द्योग बोर्डाकडून आर्थिक मदत मिळणार आहे, असें समजतें. बोर्डाच्या अध्यक्ष श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय ह्यांनीं राज्यां-तील ग्रामोद्योगांचा अभ्यास करण्यासाठीं नुकताच एक दौरा काढला होता. त्यामधून ही मदतीची योजना निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेशांत मुरादाबाद येथें पितळेच्या भांड्यांवर नक्षीकाम करण्याचा धंदा चालतो. ह्या धंद्याचा विकास घडवून आणण्याची योजना बोर्डानें तयार केली आहे. मुरादाबाद येथें तरुण कामगारांना प्रस्तुतच्या धंद्याचें शिक्षण देण्याचीहि व्यवस्था करण्यांत येणार आहे. मुरादाबाद येथें अध्यक्षांचा मुक्काम असतांना त्यांनीं धंद्याच्या सर्व अंगोपांगांची बारकाईनें चौकशी करून माहिती मिळविली आहे. मुरादाबादनंतर त्या बनारस येथें गेल्या होत्या. बनारस येथील रेशमाचा धंदा, खेळण्याचा धंदा आणि पितळेच्या भांड्याचा धंदा ह्यांचीहि माहिती त्यांनीं करून घेतली. चुनार येथें चिनी मातीच्या भांड्याचा धंदा चालतो आणि मिर्झापूर येथें सतरंज्या विण-ण्याचा धंदा चालतो. वरील धंद्यांचा विकास घडवून आणण्या-साठीं काय काय करतां येईल ह्याचा अभ्यास करण्यांत आला आहे. चिनी मातीच्या धंद्याची प्रगति घडवून आणण्यासाठीं उत्तर प्रदेश सरकार आधींपासूनच प्रयत्न करीत आहे. परदेशी बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीनें कांहीं चिनी मातीच्या भांड्याचे नमुने परदेशांत पाठविण्यांत आले आहेत. उत्तर प्रदेश सरकारच्या ग्रामोद्योग खात्यानें हा माल अमेरिकेंत आणि युरोपमध्यें पाठवून १,५०,००० रुपयांची कमाई केली आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १३ जानेवारी १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इं. फा. कॉर्पोरेशनच्या चौकशीचा अहवाल

### बोर्डाचा खुलासा

इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी भारत सरकारनें श्रीमती सुचेता कृपलानी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिती नेमली होती. तिचा अहवाल व त्यावरील सरकारचा अभिप्राय ह्यांचा परामर्श "अर्था"च्या ३० डिसेंबरच्या अंकांत घेण्यांत आला आहे. ह्या अहवालावर कॉर्पोरेशनच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं आपलें मत व्यक्त केलें आहे. मोठे उद्योगपती व त्यांचे सहकारी ह्यांचेच अर्ज बहुसंख्य होते, असें कमिटीनें म्हटलें आहे. बोर्डाचें ह्याला उत्तर असें कीं, कॉर्पोरेशनला पैशाचा तुटवडा कधींच भासला नाहीं. तेव्हां, कोणताहि मंजुरीला लायक असा अर्ज पैशाचे अभावीं परत पाठविलेला नाहीं. सर्व अर्जांचा निकाल त्यांच्या पात्रतेवरच करण्यांत आला. तो अर्ज मोठ्या उद्योगपतीचा होता का लहान कारखानदाराचा होता, एखाद्या गटांतील इसमाचा होता का नव्हता, जुन्या उद्योगाचा होता का नव्या उद्योगाचा होता, कॉर्पोरेशनच्या डायरेक्टराचा त्यांत् संबंध होता का नव्हता, ह्याचा कधींच विचार केला गेला नाहीं. भारतांतील उद्योगक्षेत्रच मर्यादित आहे व त्यांतील भाग एकमेकांशीं गुंतलेले आहेत. त्यामुळें कांहीं मोठ्या उद्योगपतींचेच अर्ज जास्त आले, तर तो परिस्थितीचा परिणाम आहे; कॉर्पोरेशनचा दोष नाहीं.

ज्या अर्जांत चेअरमन, डायरेक्टर किंवा मॅनेजिंग डायरेक्टर हे लक्ष घालतात तो अर्ज लवकर विचारांत घेतला जातो व त्यास अधिक सुलभ अटी मिळतात, अशीं चिन्हें दिसतात, हें समितीचें विधान बोर्डाला फारच बोचक वाटतें. हें विधान करतांना समितीनें त्याच्या पुष्ट्यर्थ एकहि उदाहरण दाखवून दिलेलें नाहीं, ह्याबद्दल बोर्डानें खेद व्यक्त केला आहे. कॉर्पोरेशनकडे अर्ज करणाऱ्या फर्मला बाहेर बाजारांत कर्ज उभारतां येत नाहीं, असें बोर्ड गृहीतच धरतें, असें समितीनें म्हटलें आहे. बाजारांत योग्य अटीवर शेअर भांडवल किंवा डिबेंचर भांडवल उभारतां येत नाहीं, म्हणूनच अर्जदार फर्म कॉर्पोरेशनकडे येते, हें उघड आहे. तेव्हां, अर्जदारानें अगोदर भांडवल उभारण्याचा प्रयत्न केला व त्यांत यश आलें नाहीं, ह्याचा पुरावा त्याचेकडे मागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तसें केलें, तर ज्यांना पत किंवा लौकिक नाहीं, अशा कंपन्यांनाच कॉर्पोरेशननें कर्ज द्यावें, असा अर्थ होईल. कॉर्पोरेशननें मधून मधून कर्जदार कंपन्यांच्या परिस्थितीचा आढावा प्रसिद्ध करावा, ह्या सूचनेशींहि बोर्ड सहमत नाहीं. कारण, अशा आढाव्याचे वेळीं एखादा कारखाना अडचणींत असेल व त्या अडचणीस गैरवाजवी प्रसिद्धि मिळेल.

बोर्डाची एक्झिक्युटिव्ह कमिटी व मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांचे हातीं फार अधिकार केंद्रित झालेले आहेत, अशी समितीची तक्रार आहे. सर्वच मोठ्या कंपन्यांतून बोर्ड मुख्य धोरण ठरवितें आणि कार्यकारिणीकडे त्याच्या अंमलबजावणीचें काम असतें. इं. फा. कॉर्पोरेशनमध्यें कर्जाची रक्कम, व्याजाचा दर, तारण, हमी, इत्यादींची चर्चा एक्झिक्युटिव्ह कमिटी करते आणि निर्णय घेते. पहिल्या हप्त्याची तारीख, परतफेडीचा तपशील, कंपनीला द्यावयाचे हप्ते व बँकेंत ठेवण्याची रक्कम, व्यवहार पुरा करण्याची मुदत, इत्यादि किरकोळ गोष्टी मॅनेजिंग डायरेक्टरकडे सोंपविलेल्या असतात. बँका, विमा कंपन्या आणि इतर मोठ्या आर्थिक संस्था ह्यांमध्यें हीच कार्यपद्धति अंमलांत असते.

नऊ अर्ज प्रथम नामंजूर करण्यांत आले होते ते मागाहून फेरविचारानंतर मंजूर करण्यांत आले त्यांचा उल्लेख समितीनें केला आहे. ह्या अर्जांच्या मंजुरीसाठी बोर्डावर किंवा एक्झिक्युटिव्ह कमिटीवर दडपण आणण्यांत आलें असलें पाहिजे, असा त्यामुळें गैरसमज होण्याचा संभव आहे. तो दूर करण्यासाठीं बोर्डानें असा खुलासा केला आहे कीं ह्या सर्व प्रकरणांत अर्जदारांनीं आपल्या मूळ योजना सुधारल्यावरच किंवा त्यांतील दोष त्यांना दाखविले ते दुरुस्त केल्यावरच त्यांना मंजुरी देण्यांत आली. अर्जदारांना अर्ज नामंजूर करण्याचीं कारणें सांगितलीं जातात व त्यांना त्यांच्या योजना दुरुस्त करण्याची नेहमींच संधि मिळते. तेव्हां, इतर अर्जदारांनींहि त्यांना दाखविलेल्या चुका सुधारल्या असत्या आणि कॉर्पोरेशनच्या अटींना मान्यता दिली असती, तर त्यांच्या अर्जांचाहि विचार झाला असता. अर्जांच्या निकालास विलंब लागतो, त्यास उपाय म्हणून अर्जदार फर्म्सच्या सॉलिसिटरांचें किंवा वकिलांचें, मालकी हक्कांबाबतचें सर्टिफिकेट कॉर्पोरेशननें मान्य करावें, असें समितीनें सुचविलें आहे. परंतु कॉर्पोरेशननें स्वतःच्या कायदा-सल्लागारांकडून तीं कागदपत्रें तपासून घेण्याची आवश्यकता तेवढ्यानें नाहींशी होत नाहीं. इतरहि किरकोळ सूचनांबाबत बोर्डानें खुलासा केला आहे. ह्या सर्वांवरून असें दिसतें, कीं कमिटीनें आर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीचा नीटसा विचार केलेला नसावा. बँकांतून जी पद्धति चालू आहे, आणि जिचेविरुद्ध बँकिंग कायदा किंवा रिझर्व्ह बँक ह्यांची तक्रार नाहीं, अशी पद्धत इं. फा. कॉर्पोरेशनमध्येंहि चालू राहिली, तर तें व्यवहाराला धरूनच आहे.

### जास्त तपशील देणाऱ्या कंपनीला बक्षिस

"दि अकौंटंट" ह्या साप्ताहिकानें ग्रेट ब्रिटनमधील ज्या कंपनीच्या अहवालांत व हिशेब पत्रकांत सर्वांत जास्त तपशील दिलेला असेल, तिला बक्षिस देण्याची योजना जाहीर केली आहे. कायद्यानें आवश्यक असेल, त्यापेक्षा शक्य तेवढा जास्त तपशील कंपन्यांनीं द्यावा, हा प्रस्तुत स्पर्धेचा हेतु आहे. कंपनीचा रिपोर्ट काळजीपूर्वक वाचला, तरी त्यांत कंपनी कशाचें उत्पादन करतें, हें समजूं शकत नाहीं, अशी कित्येक कंपन्यांची परिस्थिति असते.

### मिरज स्टेट बँकेची नवी इमारत

दि मिरज स्टेट बँक लि. च्या मुख्य कचेरीच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ शनिवार, ता. ९ रोजीं सर एस्. राधाकृष्णन् ह्यांच्या हस्तें झाला.

## परराष्ट्रांत व्यवहार करणाऱ्या हिंदी बँका

### पाकिस्तानांतील कचेऱ्यांच्या संख्येंत घट

भारताबाहेर काम करणाऱ्या हिंदी बँक कचेऱ्यांची संख्या फाळणीनंतर कमी होत गेली आहे. पाकिस्तानाबाहेरील कचेऱ्यांची संख्या कायम राहिली तरी त्यांचा व्यवहार १९५२ मध्यें थोडासा घटला. सिलोन, थायलंड आणि जपान येथील व्यवहार कमी झाला; फ्रेंच इंडिया, मलाया व ग्रेट ब्रिटन येथील व्यवहार टिकून राहिला आणि बर्मामधील व्यवहारांत मात्र वाढ झाली. १९५२ अखेर नऊ परदेशांत २९ शेड्यूल्ड व ९ बिगर शेड्यूल्ड बँकांच्या अनुक्रमें ९५ व १३ कचेऱ्या काम करीत होत्या. १९५१ अखेरचे आकडे २६ शेड्यूल्ड व १२ बिगर शेड्यूल्ड बँकांच्या अनुक्रमें ११३ व १६ कचेऱ्या, असे होते. इंपीरिअल बँकेनें पाकिस्तानांतील १८ कचेऱ्या बंद केल्या, इंडियन ओव्हरसीज बँकेनें थायलंडमधील एक कचेरी बंद केली आणि युनायटेड कमर्शिअल बँकेनें हाँगकाँग येथें एक कचेरी नव्यानें सुरू केली.

शेड्यूल्ड बँकांच्या विदेशी कचेऱ्या ९५ होत्या, त्यांपैकी ६१ एकट्या पाकिस्तानांत होत्या. मलाया १२, बर्मा ८, फ्रेंच इंडिया ५, सिलोन ३, ग्रेट ब्रिटन २, जपान २, थाइलंड १ व हाँगकाँग १ अशी इतर कचेऱ्यांची वांटणी आहे.

युनायटेड बँक ऑफ इंडियाच्या १५, सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या १४, इंपीरिअल बँक ऑफ इंडियाच्या १२, इंडियन ओव्हरसीज बँकेच्या १०, युनायटेड कमर्शिअल बँकेच्या १०, बँक ऑफ इंडियाच्या ५, इंडियन बँकेच्या ५, महालक्ष्मी बँकेच्या ३, पंजाब नॅशनल बँकेच्या ३ आणि अलाहाबाद बँकेच्या २ अशा परदेशांत कचेऱ्या होत्या. इतर १६ शेड्युल्ड बँकांची प्रत्येकी १ कचेरी विदेशांत होती.

९ बिगर शेड्यूल्ड बँकांच्या परदेशांतील १३ कचेऱ्यांत १२ पाकिस्तानांत होत्या व १ फ्रेंच इंडियांत होती. पाकिस्तानांत व्यवहार करणाऱ्या एकूण ३२ हिंदी बँका होत्या व त्यांच्या तेथें ७३ कचेऱ्या होत्या. एका वर्षाचे अवधींत ह्या कचेऱ्यांची संख्या ९४ वरून ७३ वर आली.

### शिक्षणासाठी टेलिव्हिजनचा उपयोग

ब्रिटनमध्यें शिक्षण-कार्यासाठी टेलिव्हिजनचा उपयोग बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होऊं लागणार, अशीं लक्षणें दिसत आहेत. टेलिव्हिजनचा उपयोग शिक्षणांत कसा करून घेतां येईल ह्यासंबंधीं ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशननें एक प्रश्नपत्रिका शिक्षण-विषयक कार्य करणाऱ्या संस्थांना पाठविली होती. शिक्षणविषयक ३० कमिट्यांनीं असें उत्तर पाठविलें आहे कीं नभोवाणीवरून शाळांसाठी उपयुक्त असे कार्यक्रम प्रक्षेपित करण्यांत येणार असतील तर शाळा टेलिव्हिजनचे सेट्स बसवून घेण्यास तयार होतील. २० कमिट्यांनीं मात्र आपणास टेलिव्हिजनचे सेट्स बसवून घेणें परवडणार नाहीं असें कळविलें आहे. कांहीं कमिट्यांनीं मुलांसाठी होणारे कार्यक्रम कसे काय असतात ते प्रथम पाहिल्यावरच आपणास निर्णय घेणें सोपें जाईल, असें मत व्यक्त केलें आहे. तथापि, टेलिव्हिजनचा शिक्षणासाठी उपयोग करून घेण्याच्या तत्त्वाला मात्र कोणीच विरोध दर्शविलेला नाहीं. सुमारें १०० कमिट्यांनीं अद्यापि उत्तरें धाडलेलीं नाहींत. प्रयोग म्हणून लंडन आणि आसपासच्या परगाण्यांतून टेलिव्हिजनवर शैक्षणिक कार्यक्रम सध्यां प्रक्षेपित करण्यांत येत आहेत. ब्रिटनमधील शिक्षणाधिकारी टेलिव्हिजनचा असा उपयोग करून घेण्याला अर्थातच अनुकूल आहेत. त्यांतल्या त्यांत मोठ्या आणि दाट लोकवस्तीच्या मोठ्या शहरांतून अशी अनुकूलता अधिक दाखविण्यांत येत आहे. आधुनिक वैज्ञानिक शोधांचा उपयोग कसा करण्यांत यावा ह्याबद्दल सध्यां बरीच चर्चा चालू आहे. अमेरिकेंत टेलिव्हिजनवर भयानक कथानकें दाखविण्यांत येतात आणि त्यामुळें मुलांच्या मनांत विकृति उत्पन्न होते, असे विचार व्यक्त करण्यांत आले आहेत. तथापि, शास्त्रीय शोधांचा उपयोग तो करणाऱ्यांवर अवलंबून आहे, हें ब्रिटनमधील टेलिव्हिजनचा शैक्षणिक उपयोग करण्याच्या चर्चेवरून दिसून येतें.


## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


## CO-OPERATION AND ACCOUNTANCY DIPLOMA BOARD

***Results of G. D. C. A. Examination held in October, 1953 at Poona***

Passed in the whole Examination including those who passed in one or the other part previously.

**I Class**

Parikh N. S.

**II Class**

Kumari Bhide, Tilottama George, Padalikar V. V. Kulkarni P. V. Trivedi S. H.

**Pass Class**

Aminbhavi S. R. Barve A. K. Chavan D. H. Gaikwad V. V. Jagtap V. S. Joshi B. H.* Kadkol N. S. Kulkarni G. B. Mulla A. A. Patel N. F. Patil E. R. Patil S. T. Sawkar S. B. Vanarse V. R. Bhujang M. V. Desai S. S. Deshpande V. R. Hiremath G. V. Mathad B. R. Mody M. B. Patil P. V. Raydurga R. K. Bapat A. K. Bhatt R. H. Chokshi R. J. Jadhav M. R. Joglekar P. R. Joshi J. K. Khambkar B. V. Khatavkar M. G. Patil B. N. Patel T. A. Patil K. M. Phatak B. V. Soman T. R. Bhende S. S. Chaudhary M. S. Deshpande M. R. Gadkari K. R. Koteshwar N. K. Mehta V. M. Mohite D. S. Pradhan R. R. Tejwani S. L.

**Passed in 'Co-operation' Group only**

Hegdekatti G. M. Abhyankar R. D. Das Bhikari Charan, Hallikeri R. K. Pappu M. T. Patil G. B. Reejsinghani H. N. Shah H. S. Wani V. B. Telang V. M. Aursang S. R. Deo M. S. Joshi P. M. Patel H. M. Pawar B. S. Shah G. D. Sonavane A. R.

**Passed in 'Accountancy' Group only**

Konnur G. S. Bhatt J. S. Bhide P. K. Dave G. R. Gupte V. G. Inamdar R. M. Joshi S. N. Kadam B. N. Kulkarni Y. K. Mohite R. K. Patel A. F. Patel M. N. Pathak D. D. Tarkasband R. D. Varade V. R. Wadekar S. L. Mehta P. G. Bhavsar C. C. Bhonsale D. S. Erram S. S. Habbu G. S. Iyengar Vaidehi, Kulkarni V. A. Mehta S. N. Naik A. R. Patel G. N. Patel N. F. Raj U. H. Vaidya V. G. Vartak V. G.

* Not eligible for Government Diploma in Co-operation and Accountancy.

**P. J. Chinmulgund,**
Registrar of Co-operative Societies,
Bombay State, Poona, and
Chairman, Co-operation and Accountancy
Diploma Board, Poona.

## औद्योगिक बेकारीनिवारणाचे दीर्घकालीन उपाय

### परदेशी भांडवल येण्यास कां बुजतें ?

( श्री. श्री. वा. काळे, संपादक " अर्थ " ह्यांचा चित्रमयजगत् औद्योगिक विकास विशेषांक, जानेवारी १९५४, मधील लेख )

" चालू उत्पादन उचलूं शकेल, इतकेंच नव्हे तर वाढत जाणारें उत्पादनहि संपवूं शकेल अशी मागणी पुरेशा गतीनें वाढत आहे किंवा नाहीं; म्हणजे लोकांचें उत्पन्न सुधारून रोजगार वाढण्यास उत्तेजन मिळत आहे किंवा नाहीं " हा बेकारीच्या संबंधांतील महत्त्वाचा प्रश्न आहे, असें अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं नुकतेंच सांगितलें. पुरेशा प्रमाणांत नवा पसा उद्योगधंद्यांत गुंतविला जात आहे किंवा नाहीं, हा प्रश्न ओघानेंच येतो. नवी गुंतवणूक अधिक मोठ्या प्रमाणावर होणें, हाच बेकारीवरील दूरगामी उपाय असल्याचें श्री. देशमुख ह्यांनीं सांगितलें, आणि पंचवार्षिक योजनेमध्य गृहीत धरल्याप्रमाणें अशी गुंतवणूक अजून होऊं लागलेली नाहीं असें त्यांनीं स्पष्ट केलें. खासगी मालकीच्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचें सरकारचें धोरण असून त्याबाबत प्रयत्न चालू आहेत. ग्रेट ब्रिटन मधील आपल्या शिलका आणि परदेशी मदत ह्यांचा अधिकांत अधिक चांगला उपयोग करण्याचें महत्त्वहि त्यांनीं प्रतिपादन केलें. देशाचा आर्थिक व औद्योगिक विकासहि त्याच्या उत्पादनक्षमतेवर अवलंबून असतो आणि ही उत्पादनक्षमता भांडवलाच्या निर्मितीवर अवलंबून राहत. ही भांडवलनिर्मिति अंतर्गत बचत व परकीय मदत ह्यांच्या उपलब्धतेवर अवलंबून असत. ह्या दृष्टीनें भारताची आज परिस्थिति काय आहे हें पाहिलें पाहिजे.

### भारतांत दीर्घकाल भांडवलाची आयात

भारत हा देश दीर्घकाल परकीय भांडवलाची आयात करीत होता. १८५४ ते १८६९ च्या दरम्यान भारतांत १५ कोटी पौंड ब्रिटिश भांडवलाची गुंतवणूक झाली. रेल्वेमार्ग मोठ्या प्रमाणावर तयार करण्यांत ब्रिटिश कंपन्या गुंतल्या होत्या आणि १८६८ च्या सुमारास ह्या रेल्वे कंपन्यांचे सुमारें ५० हजार शेअरहोल्डर्स व डिबेंचर होल्डर्स होते, ते बहुतेक सर्वच्या सर्व इंग्रज होते. त्यांची प्रत्येकाची सरासरी गुंतवणूक १,५०० पौंड होती. १८६२–५ हीं वर्षे सोडलीं तर १८७८ सालपर्यंत एकहि वर्ष असें गेलें नाहीं कीं, ज्या वर्षी भारताकरतां ग्रेट ब्रिटनमध्यें कर्ज उभारलें गेलें नाहीं.

हिंदी रेल्वेजमधील गुंतवणुकीबरोबर चहाचे मळे, तागाच्या गिरण्या, बँका, शिपिंग कंपन्या, आयात–निर्गातीच्या फर्म्स, इत्यादींतहि कितातरी मोठें ब्रिटिश भांडवल आकृष्ट झालें. ईस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा कारभार इंग्रज राणीनें स्वतःकडे घेतला, त्यानंतरच्या पहिल्याच २० वर्षांत एवढी मोठी आर्थिक घडामोड झाली. ब्रिटिश भांडवलाची भारतांत सुरू झालेली आयात तशीच अखंड आणखी ५० वर्षे चालूं राहिली. १९२० च्या सुमारास व्यापार व उद्योगधंदे ह्यांत भांडवल गुंतविण्यासाठी बरेच हिंदी लोक पुढें येऊं लागले, पण भारत सरकारची ग्रेट ब्रिटनमधील कर्जउभारणी चालू राहिलीच. नवें ब्रिटिश भांडवल येत होतें, त्याबरोबर जुन्या गुंतलेल्या भांडवलावरील नफाहि भारतांतच गुंतविला जात होता. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं मात्र परिस्थिति बदलली आणि नवें ब्रिटिश भांडवल भारतांत येण्याऐवजीं जुनें भांडवलच पळ काढूं लागलें. नव्या राजकीय बदलाशीं मिळतें घेणें हा त्यांतील एक हेतु होता आणि त्याबरोबरच जुने चालूं उद्योगधंदे विकत घेऊन चालविण्यास हिंदी पुंजीपति

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,१००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,५००
शाखा:- दादर माहीम
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखा:- बेळगांव पुणें
स्थापना १९१८

पुढें येत होते, हेंहि खरें आहे. मॅनेजिंग एजन्सीचे मालकी हक्क इंग्रजांच्या हातून हिंदी लोकांच्या हातांत येऊं लागले. ज्या मानानें ब्रिटिश भांडवल भारतांतून परत गेलें, त्या मानानें नवें भांडवल आलें नाहीं. इंग्रजांच्या बचतीमधून निर्माण होणाऱ्या भांडवलाचा झरा हिंदी उद्योगधंद्यांस जीवन देत होता, तो आटल्यावर त्याची जागा घेण्यासाठी स्थानिक बचतींतून निर्माण होणारे भांडवलाचे असंख्य ओहोळ आतां आवश्यक झाले आहेत. त्याचबरोबर विदेशी भांडवलाचा बंद पडलेला झरा पुन्हा चालूं व्हावा, ह्यासाठींहि प्रयत्नांची जरूरी आहे. युद्धोत्तर झालेल्या राजकीय स्थित्यंतरानंतरहि परदेशी भांडवलाची आवश्यकता कोणीहि नाकारलेली नाहीं; कारण पुरेसें स्थानिक भांडवल उपलब्ध होण्याजोगें नाहीं याची सर्वांना जाणीव आहे. तथापि, गेलीं शंभर वर्षे ज्या ग्रेट ब्रिटननें भारताला भांडवल पुरविलें, तो देशच स्वतः आतां ऋणको झाल्यामुळें त्याच्याकडून भारतांत भांडवल आयात होणें कठीण झालें आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें आपलें सांठलेलें येणें यंत्रसामुग्रीची आयात व परराष्ट्रांतील येण्यादेण्यांतील प्रतिकूल तफावत हीं भागविण्यासाठी उपयोगांत आणलें गेलें आहे व आणलें जात आहे.

### खासगी भांडवलास वाव

भारतांत उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाची लाट प्रथम उसळली, ती पुढें जोरास लागली नाहीं. ह्याचें कारण सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांस लागणारा पैसा पुरविणें सरकारच्या शक्तीबाहेरचें आहे, ह्याची झालेली जाणीव हें आहे. खाजगी भांडवलदारांच्या विरुद्ध प्रारंभीं जें वातावरण होतें तें पुढें टिकून राहूं शकलें नाहीं आणि सार्वजनिक नियंत्रणाकडे कायद्यांचा आणि अधिकारी लोकांच्या विचारांचा कल असला तरी खाजगी भांडवलास नाराज करतां येण्याजोगी परिस्थिति नव्हती व नाहीं. त्यामुळें पंचवार्षिक योजनेंत खाजगी भांडवलास बराच मोठा वाव दिला गेला आहे. पंचवार्षिक योजना यशस्वी झाली नाहीं, तर त्याचे आर्थिक दुष्परिणाम मोठे होतील आणि त्याबरोबर अनिष्ट राजकीय आंदोलनासहि चालना मिळण्याचा संभव आहे. सहाजीकच, राज्यकर्ते आणि भांडवलदार ह्या दोघांच्याहि दृष्टीनें पंचवार्षिक योजनेस यश प्राप्त होणें अत्यावश्यक आहे. त्यासाठी, उद्योगधंद्यांत मोठ्या प्रमाणावर नवें भांडवल गुंतविलें गेलें पाहिजे. जनतेच्या आर्थिक व सामाजिक उद्धाराचा प्रश्न बाजूस ठेवला, तरी सध्यां आहे हें रहाणीचें निकृष्ट मान टिकून रहावयाचें म्हटलें तरी नव्या भांडवलाची गरज आहे. कारण, लोकसंख्येची वाढ इकडे चालूच आहे. नवें भांडवल परदेशांतून येऊं शकेल किंवा स्थानिक बचतीमधून निर्माण होऊं शकेल.

## परदेशी भांडवलाबद्दल साशंकता

युनायटेड स्टेट्स लॅटिन अमेरिकेंतील देशांत म्हणजे ब्राझील, कोस्टारिका, वेनेझुएला, युरुग्वे, पनामा, इत्यादि देशांत आतां फार मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवीत आहे. जगांतील पुष्कळ देशांत भरपूर कच्चा माल उपलब्ध आहे; परंतु त्यांपैकी कांहीं देशांकडेच परदेशांतील खाजगी भांडवल आकृष्ट होऊं शकलें आहे. दक्षिण आणि आग्नेय आशियांतील देशांत परदेशी भांडवलाबद्दल फार साशंकता वाटते आणि त्या भांडवलाविरुद्ध प्रचार केला जातो, त्यामुळें अमेरिकन भांडवल भारत प्रभृति देशांकडे न येतां दक्षिण अमेरिका खंडांतील देशांकडे त्याचा ओघ वळतो. परदेशी भांडवल आणि परदेशीयांचें वर्चस्व ह्यांचें साहचर्य हिंदी व आशियांतील इतर देशांतील लोकांना परिचयाचें असल्या कारणानें त्यामधील राजकीय पुढाऱ्यांनीं परदेशी भांडवलावर कडक टीका करण्याचें आजवर कधींच सोडलें नव्हते. सहाजीकच त्यांचीं मतें एकाएकीं बदलणें शक्य नाहीं. परदेशीयांनीं येथें पैसे गुंतविले तर त्याबरोबर राजकीय किंवा इतर बंधनें येणें अटळ नाहीं, हें अद्याप लोकांना पटूं शकत नाहीं; आणि विदेशी भांडवलदारांनीं तारणाची मागणी केली तर त्याला अनिष्ट हेतु चिटकावून दिले जातात. भांडवल देणारे व घेणारे ह्यांच्यामध्यें शुद्ध हेतूबद्दल साशंकता असेल, तर ती उभयपक्षास हितावह होणार नाहीं. परदेशीयांनीं करावयाची गुंतवणूक व्यापारी क्षेत्रांत फारशी स्वागतार्ह वाटत नाहीं; पण औद्योगिक क्षेत्रांत मात्र थोड्या कडक अटी पत्करण्यासहि हिंदी सरकार व जनता तयार होते. परदेशी भांडवलदारांनीं येथील लोकांना यांत्रिक व तांत्रिक ज्ञान देऊन शिकवून तयार केलें आणि त्या भांडवलदारांनीं हिंदी भांडवलदारांशीं सहकार्य केलें तर तें हितकारक ठरतें, असा आजचा अनुभव आहे. परदेशीय भांडवल येथें आकर्षावयाचें तर त्यास योग्य तें वातावरण हवें आणि तें निर्माण करण्याचा प्रयत्न हिंदी सरकारनें व हिंदी भांडवलदारांनीं केला पाहिजे.

( अपूर्ण )

**कामगार संघटनेचा उपक्रम**—हॅवाना-क्यूबा-येथील हॉटेल कामगारांनीं आपल्या मालकीचें एक प्रचंड हॉटेल बांधण्याचें ठरवून त्यासाठीं पैसा जमविण्यास सुरवात केली आहे. ह्या इमारतीसाठीं १ कोटी डॉलर्स खर्च येणार आहे. इमारत २२ मजली होणार असून तींत ६५० खोल्या बांधल्या जातील. अमेरिकेंमधील सुप्रसिद्ध हिल्टन कॉर्पोरेशन ह्या संस्थेतर्फे तें चालाविण्यांत येणार आहे. न्यूयॉर्कमधील वाल्डार्फ ऑस्टोरिआ हें विलासी हॉटेल हीच संस्था चालविते.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.


आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :


ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर

पॉवरवर चालणारे



वसंत नं. ३ चरक



" शरद चरक "

उसाचे चरक

हंगाम नजीक आला !

—सविस्तर माहितीसाठीं आजच लिहा.—

किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी, (जि. द. सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल्. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

# दि बेळगांव बँक लिमिटेड, बेळगांव

## जयसिंगपूर शाखेचें उद्घाटन

शुक्रवार ता. १ जानेवारी रोजीं दुपारीं ४ वाजतां जयसिंगपूर येथें निपाणीचे सुप्रसिद्ध व्यापारी व बँकर शेठ देवचंद शहा एम्. एल्. सी. यांच्या हस्तें बेळगांव बँक लि. च्या २२ व्या शाखेचें उद्घाटन मोठ्या उत्साहानें करण्यांत आलें. या प्रसंगीं बँकेचे वयोवृद्ध चेअरमन श्री. गजेंद्रगडकर, व्हा. चेअरमन श्री. देशपांडे, डायरेक्टर्स श्री. हेरेकर, सराफ, नाईक, मॅनेजर श्री. कुलकर्णी व इतर अधिकारी बेळगांवाहून आले होते. तसेंच निपाणी, चिकोडी, मिरज, सांगली, संकेश्वर, येथून प्रमुख व्यापारी, अगत्यपूर्वक उपस्थित होते. जयसिंगपूरचे नगराध्यक्ष श्री. पाटील, तालुका कॉंग्रेस कमेटीचे अध्यक्ष डॉ. भिर्डी व व्यापारीवर्ग मोठ्या संख्येनें हजर होते.

### श्री. सराफ ह्यांचें भाषण : शाखा विस्ताराचें धोरण

प्रारंभी बोर्डातर्फे डायरेक्टर, श्री. गोविंदराव सराफ, हे स्वागतपर भाषण करतांना म्हणाले:- " नव्या वर्षाचा प्रारंभ, जयसिंगपूरसारख्या वाढत्या व्यापारी गांवांत शाखा उघडण्यानें होत असल्यानें आम्हां सर्वांस फार आनंद वाटणें साहजिक आहे. १९३० सालीं अवघ्या दहा हजार वसूल भांडवलावर सुरू करण्यांत आलेली बेळगांव बँक ही आज दक्षिण विभागांतील प्रमुख शेड्यूल्ड बँक गणली जात असून तिचें वसूल भांडवल ६ लाख व खेळतें भांडवल ९६ लाखांवर आहे. भागीदारांना सतत ६¼% डिव्हिडंड देण्यांत आलें असून नुकतीच बँकेची इमारत सेफ डिपॉझिट व्हॉल्टसह पुरी करण्यांत आली आहे. १९४५ सालापासून निपाणी येथें व्यापारीवर्गास आमच्या बँकेकडून ज्या सोयी मिळाल्या त्या पाहूनच जयसिंगपूर येथेंही आम्हीं एक शाखा उघडावी, असा आग्रह येथील व्यापारी बंधूंनीं गेल्या तीन वर्षांपासून चालविला आहे व म्हणूनच रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार ही शाखा आज जयसिंगपूर येथें सुरू करण्यांत येत आहे. आमचे पुष्कळ भागीदार व हितचिंतक आम्हांस पुणें व मुंबई येथें तुम्हीं शाखा कां उघडत नाहीं? असें विचारतात. आम्हीं त्यांना सांगतों 'पाहूं पुढें.' परंतु आम्हीं तेथें शाखा न उघडण्याचें कारण, तेथील व्यापारी किंवा सधन लोक हे आम्हांस बोलावीत नाहींत व त्याचें कारण त्यांना आमची जरूरी नाहीं, हेंच होय. ज्यांची जेथें उपयुक्तता असेल तेथेंच त्यांनीं कार्य करणें उभयपक्षीं हिताचें ठरतें. आम्हीं याच तत्त्वास अनुसरून आमच्या बँकेचा शाखाविस्तार करीत आलों आहोत व अनुभवांतीं आम्हांस तें पटलें आहे. बड्या बँकांविषयीं आम्हांस कांहीं सांगावयाचें नाहीं. परंतु मध्यम आकाराच्या स्थानिक व्यापारी बँकांनीं आपल्या शाखा उपयुक्ततेकडे लक्ष देऊन उघडल्यास त्यांची शक्ति व वेळहि निष्कारण खर्ची न पडतां सत्वर फलदायी ठरतील. या शाखेचें उद्घाटन शेठ देवचंद यांच्या हातून होत आहे हा सुवर्णयोग होय. "

### उद्घाटक, श्री. देवचंद, ह्यांचें भाषण

यानंतर शेठ देवचंद, शाखेचें उद्घाटन झाल्याचें जाहीर करून म्हणाले:- "जयसिंगपूर हें औद्योगिक व व्यापारी केंद्र म्हणून वाढीस लागलें असून, त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. कृष्णाकांठचा सुपीक प्रदेश, निरोगी हवा, आणि नगररचनेस अनुकूल असा भूप्रदेश, अशी या शहराची ठेवण असल्यानें व्यापारी वर्गास त्याचें आकर्षण वाटतें. "

बेळगांव बँकेच्या कार्याचें वर्णन करतांना ते म्हणाले, "व्यापारी लोकांचे हितसंबंध अबाधित राखण्यास व त्यांना मदत करण्यास ही बँक सदैव तत्पर असते. निपाणी येथें १९४५ पासून या बँकेची शाखा सुरू असून तिनें लोकप्रियता मिळविली आहे. सर्व दर्जाच्या लोकांना किफायतशीर अशा विविध योजना या बँकेनें आंखल्या आहेत, हें या बँकेचें वैशिष्ट्य आहे."

### संदेश व पानसुपारी

या प्रसंगीं बरेच शुभसंदेश आले होते, त्यांत "अर्थ"चे संपादक श्री. काळे, डेक्कन बँक्स असोसिएशन, रावबहादुर शेंबेकर, श्री. लगाडे, यांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल.

शेवटीं पानसुपारी व अल्पोपहार होऊन समारंभ आटोपला.

# मिरज स्टेट बँक लि., मिरज

## इमारतीचा उद्घाटन समारंभ

मिरज स्टेट बँकेच्या सेफ-डिपॉझिट् व्हॉल्टनें सुसज्ज अशा नवीन इमारतीचा उद्घाटन-समारंभ भारताचे उपराष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचे हस्तें ता. ९ जानेवारी, १९५४ रोजीं मिरज येथें झाला. अशा इमारतीची आवश्यकता बँकेच्या वाढत्या कार्याच्या दृष्टीनें भासत होती. ती अपेक्षा पुरी झाली असून त्यामुळें बँकेच्या प्रगतीचें पुढचें पाऊल टाकलें गेलें आहे.

मिरज स्टेट बँकेची स्थापना ता. ३० एप्रिल, १९२९ रोजीं मिरज संस्थानांत झाली असून ता. ३० एप्रिल, १९५४ रोजीं तिला २५ वर्षें पुरीं होतील. या कालांत बँकेची सर्वांगीण प्रगति झाली असून तिचें स्थूल स्वरूप खालीलप्रमाणें आहे:—

वसूल भांडवल—सहा लाख रु.

जनरल रिझर्व्ह फंड—पांच लाख, सव्वीस हजार रु.

ठेवी—चाळीस लाख रु.

सरकारी रोख्यांतील गुंतवणूक—एकवीस लक्ष, साठ हजार रु.

बँकेच्या स्थापनेपासूनच मिरज संस्थानचे माजी अधिपति कै. श्रीमंत बाळासाहेब यांचा सक्रिय पाठिंबा या बँकेस लाभला होता. त्यानंतरचे अधिपति, श्रीमंत नारायणराव उर्फ तात्यासाहेब पटवर्धन, यांची सक्रिय सहानुभूति व अचूक मार्गदर्शन ह्या बँकेच्या प्रगतीस कारणीभूत होत आहे. ही बँक रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या तपासणीस उतरली असून तिला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा ता. ४ एप्रिल १९४९ पासून प्राप्त झाला आहे.

बँकेच्या नवीन इमारतीचा उत्खनन समारंभ बँकेचे कार्यक्षम चेअरमन रावसा. व्ही. पी. बेडेकर यांचे हस्तें ता. २०-१०-५२ रोजीं झाला. कोनशिला समारंभ श्रीमंत राजे तात्यासाहेब पटवर्धन यांचे हस्तें ता १६-३-५३ रोजीं झाला. या इमारतीचा उद्घाटन समारंभ आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तत्त्वज्ञ मुत्सद्दी डॉ. राधाकृष्णन् यांचे शुभ हस्तें झाल्यानें बँकेचा गौरवच झाला आहे.

**भारतामधील मोटारींचे कारखाने**—भारतामधील मोटारींच्या कारखान्यांत १० कोटी, ३ लाख रुपये भांडवल गुंतविलेलें आहे, त्यापैकीं ९० लाख १० रुपये भांडवल परकीय आहे. कामगारांची संख्या ६,००० असून प्रत्येक कामगार सरासरी १४५ रुपये मासिक वेतन मिळवितो.

## भारतांत इटालियन चित्र–निर्माते

भारतांत चित्रपट काढण्याची कितपत शक्यता आहे तें अजमावून पहाण्यासाठीं ३ इटालिअन चित्र–निर्माते भारतांत आले आहेत. इटलीमध्यें 'टिटॅनस्' नांवाची एक खूप मोठी चित्रपट संस्था आहे. चित्रपटांची निर्मिती आणि वितरण अशीं दोन्हीं कामें ही संस्था करते. ह्या कंपनीचे निर्माते डॉ. ब्लासो, छाया–चित्रक क्लॉड रेनॉर आणि डायरेक्टर गिलोमॅर्की हे तिघेहि सध्यां भारतांत फिरत आहेत. भारतामधील लोकांचें जीवन यथार्थतेनें चित्रित करूं शकेल अशा चित्र–कथेच्या शोधांत ते आहेत. भारतांत एक महिनाभर घालवून दिल्ली, कलकत्ता, बनारस, मद्रास, म्हैसूर आणि इतर कांहीं शहरांना ते भेटी देणार आहेत. कंपनीचे निर्माते डॉ. ब्लासो पत्रकारांना दिलेल्या मुलाखतींत म्हणाले कीं, भारत हा देश फारच औत्सुक्यपूर्ण आहे. इटलींतील लोकांना आधुनिक भारताचें खरेंखुरें दर्शन करून यावें, अशी आमची मनीषा आहे. पाश्चात्य देशांत पुष्कळ जणांची अशी कल्पना असते कीं, भारतांत फक्त महाराजे आणि गारुडी ह्यांचीच काय ती वसती आहे. पण तसें नाहीं. भारतांत पुष्कळ गोष्टी अशा आहेत कीं, त्यांना मनोरंजनाच्या दृष्टीनें आणि शैक्षणिक दृष्टीनें खूपच महत्त्व आहे. भारत हा देश असा आहे कीं, तो प्रगत होऊं शकेल. भारत हा सामर्थ्यशाली देश आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर परदेशांचें कुतूहल अर्थातच वाढलें आहे. इटालियन कंपनीचा भारतामधील दौरा हा ह्या कुतुहलांतूनच निर्माण झालेला आहे.

---

## नाशिक को. ट्रेनिंग क्लासचा रिझल्ट

नाशिक सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासची परीक्षा होऊन रिझल्ट लागला आहे. त्यांत एकूण ३६ विद्यार्थी परीक्षेस बसले त्यापैकीं ३३ विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत. त्यांपैकीं पहिल्या श्रेणींत १, दुसऱ्या श्रेणींत ११ आणि पास क्लासमध्यें २१ उत्तीर्ण झालेले आहेत. त्यांचीं नांवें खालीलप्रमाणें:—

**पहिली श्रेणी:**—१ श्री. सिताराम सदाशिव वैशंपायन.

**दुसरी श्रेणी:**—२ श्री. एस. वाय कव, ३ श्री. भिका उखाराम पाटील, ४ श्री. गोविंद रामचंद्र कुलकर्णी, ५ श्री. देवीदास दत्तात्रेय सोमणी, ६ श्री. चिमण पुंजाजी मत्सागर, ७ श्री. बाबूलाल गंगाराम गुरव, ८ श्री. पांडुरंग उखाशेट सोनार, ९ श्री. भास्कर लक्ष्मण भवळी, १० श्री. वसंत प्रभाकर कामत, ११ श्री. नारायण लक्ष्मण भास्कर, १२ श्री. श्रीधर शंकर दीक्षित.

**तिसरी श्रेणी:**—१३ श्री. गणपत बापू बोरस्ते, १४ श्री. अनंतराव दादासाहेब देशमुख, १५ श्री. बारकू शंकर जमधडे, १६ श्री. किसन शिवराम सुरशी, १७ श्री. शंकर सदाशिव ढिकळे, १८ श्री. नारायण लक्ष्मण जोशी, १९ श्री. यशवंत तात्याबा कावळे, २० श्री. बळवंतराव लक्ष्मणराव गरूड, २१ श्री. पोपट उखा पाटील, २२ श्री. निवृत्ति गोविंद निकम, २३ श्री. हरि आत्माराम जवळेकर, २४ श्री. केरू रामजी भालेराव, २५ श्री. हरीभाऊ काळू माळी, २६ श्री. दत्तात्रेय नारायण वाणी, २७ श्री. जगन्नाथ हरिशेट सूर्यवंशी, २८ रामचंद्र सखाराम साळी, २९ श्री. विश्वनाथ गोपाळ शुक्ल, ३० श्री. विठ्ठल रामचंद्र बेंडकुळे, ३१ श्री. शंकर कृष्णा काळे, ३२ श्री. त्र्यंबक दगडू शिंदे, ३३ श्री. दत्तात्रेय दामोदर सोनवणे.

एन. वाय. कुलकर्णी
को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नाशिक.


# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५१।१६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें; पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिश्रखत यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्टया, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.



# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

**स्थापना : १९४३**

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली — चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. B. मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.